मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका उभारणार 5 कोटींची 'क्लायम्बिंग वॉल'

## पिंपळे सौदागर येथील योगा पार्कमध्ये कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत बांधण्यात येणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपळे सौदागर येथे योगा पार्कमध्ये पाच कोटी रुपये खर्च करून कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत (क्लायम्बिंग वॉल) उभारण्यात येत आहे. त्या भिंतीचे परिचालन खासगी संस्थेकडे विनामूल्य २० वर्षे देण्यात आले आहे. त्यामुळे स्पर्धा आयोजन, प्रशिक्षण व इतर कामकाज संस्था पाहणार आहे.

पिंपळे सौदागर येथील योगा पार्कमध्ये कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत बांधण्यात येत आहे. या संदर्भात महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भारतीय पर्वतारोहण या स्पोर्ट्स क्लायम्बिंग संस्थेचे सचिव कीर्ती पैस यांच्याबरोबर बैठक झाली. बैठकीतील चर्चेनुसार महाराष्ट्र स्पोर्ट्स असोसिएशनने कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत परिचालनासाठी महापालिकेस प्रस्ताव दिला आहे. त्यास आयुक्त सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

महापालिका संबंधित संस्थेबरोबर करारनामा करणार असून, तो २० वर्षांसाठी असणार आहे. संबंधित संस्था स्पोर्ट्स क्लायम्बिंगचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक नेमणार आहे. सभागृह, स्टोअर रूम, स्वच्छतागृह व स्नानगृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आवार आणि प्रतीक्षा कक्ष आदी ठिकाणचे विजेचे शुल्क संस्था भरणार आहे. शहरातील खेळाडूंना प्रशिक्षण देणे, शहरात या खेळाचा प्रसार व प्रचार करणे, महापालिका शाळेतील कमीत कमी ५० आणि जास्तीत जास्त ८० विद्यार्थी-खेळाडूंना या ठिकाणी मोफत प्रशिक्षण देणे संस्थेवर बंधनकारक आहे. संस्थेला या ठिकाणी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करावे लागणार आहे. भिंतीच्या परिसरातील फ्लड लाइट व दिव्यांच्या खांबांसाठी लागणारी वीज, तसेच भिंतीसाठी पाणी व सुरक्षा महापालिका मोफत पुरविणार आहे. त्या ठिकाणी नव्याने काही गोष्टी आवश्यक असल्यास महापालिका विकसित करून देणार आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजनासाठी महापालिका निधीही देणार आहे.

### कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत धूळखात

» महापालिकेच्या वतीने नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडिअमच्या आवारात कृत्रिम प्रस्तरारोहण भिंतीची उभारणी करण्यात आली होती. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून साहित्यही खरेदी करण्यात आले. त्या ठिकाणी काही स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. मात्र, काही वर्षांतच भिंतीचा वापर बंद करण्यात आला.

---

# मुळा नदीकाठी 33 झाडांची विनापरवाना तोड

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले असताना नदीकाठावरील ३३ झाडे विनापरवाना तोडल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी उद्यान विभागाने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत महापालिकेचे उद्यान सहायक अनिल गायकवाड यांनी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियमनुसार फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तींविरोधात सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने २०० कोटींचे कर्जरोखे उभारून मुळा नदी सुधार प्रकल्प हाती घेतला आहे. त्यात वाकड बायपास ते सांगवी येथील पुलापर्यंतचे काम पहिल्या टप्प्यात करण्यात येत आहे. हे काम सुरू असताना पिंपळेनिलख येथील अवैध वृक्षतोड झाल्याची तक्रार पर्यावरणप्रेमींनी केली होती. त्यानुसार उद्यान विभागाने नदीकाठी जाऊन पाहणी केली.

पिंपळेनिलख येथील पंचशीलनगर, इंगवले चौकाशेजारील मुळा नदी काठावरील एकूण २१ वृक्ष तोडल्याचे दिसून आले. त्यात दोन सुबाभूळ, एक कडुलिंब, १७ काटेरी बाभुळ या झाडांचा समावेश आहे. तर, पिंपळे निलख स्मशानभूमी शेजारील बारा झाडे तोडण्यात आली आहेत. त्यात दोन काटेरी बाभूळ, तीन सुबाभूळ, पाच करंज, एक उंबर, एक विलायची चिंच या झाडांचा समावेश आहे. नदीकाठी विनापरवाना वृक्षतोड झाल्याचे दिसून आले. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असल्याचे उद्यान विभागाचे सहायक आयुक्त उमेश ढाकणे यांनी सांगितले.

# पाणीपट्टीचे 200 कोटी जलसंपदाला जमा

## विभागाला मार्चअखेर पाणीपट्टीपोटी 422 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त

**पुणे | प्रतिनिधी**

पाणीपट्टी भरा, अन्यथा पाणीकपात करू, असा इशारा जलसंपदा विभागाने दिल्यानंतर महापालिकेने नमती भूमिका घेत २०० कोटी रुपयांची थकबाकी जमा केली. जलसंपदा विभागाची महापालिकेकडे ७१४ कोटी रुपयांची थकबाकी असून, महापालिकेकडे अजूनही ५०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. दरम्यान, विभागाला मार्चअखेर पाणीपट्टीपोटी ४२२ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. गेल्या आठ वर्षांमधील हा सर्वाधिक महसूल असल्याचे खडकवासला प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक श्वेता कुऱ्हाडे यांनी सांगितले.




महापालिकेकडे जलसंपदा विभागाची सुमारे ७१४ कोटी रुपयांची पाणीपट्टीसह दंडाची थकबाकी होती. थकबाकी वसुलीसाठी जलसंपदा विभागाने दोनदा महापालिकेला स्मरणपत्र पाठविले होते. त्यानंतर कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतही याबाबत चर्चा झाली. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीसुद्धा पाणीपट्टी भरा, अन्यथा कपात करावी लागेल, असा इशारा दिला होता. याच बैठकीत अखेर महापालिका आयुक्तांनी काही रक्कम भरण्याची तयारी दाखविली होती. त्यानुसार पुणे महापालिकेने ७१४ कोटींपैकी २०० कोटी रुपयांची रक्कम भरली. अजूनही सुमारे पाचशे कोटींहून अधिक थकबाकी आहे. महापालिकेने दंडाची रक्कम भरण्याची तयारी दाखविली असल्याचे कुऱ्हाडे यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाच्या खडकवासला प्रकल्पांतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीसाठी पाणी पुरविले. या पाणीपट्टीपोटी जलसंपदा विभागाने आतापर्यंत गेल्या आठ वर्षांतील विक्रमी वसुली केली आहे. सिंचनासह बिगरसिंचनासाठी पाणीपुरवठा केल्याने पुणे, पिंपरी चिंचवड महापालिकेसह अन्य विभागांकडून ४२२ कोटी ४५ लाख ६७ हजार रुपयांची वसुली झाली. यात बिगरसिंचनासाठी ४१८ कोटी ३८ लाख रुपयांची वसुली (११५ टक्के) केली आहे. सिंचनाला केलेल्या पाणीपुरवठ्याद्वारे ४ कोटी ९ लाख म्हणजेच १०९ टक्के वसुली केली. सिंचनासाठी ३ कोटी ७५ लाख रुपयांचे उद्दिष्ट होते. त्या तुलनेत ४ कोटी ७ लाख सहा हजारांची वसुली झाली. तसेच बिगरसिंचनासाठी ३६२ कोटी ३९ लाख रुपयांचे उद्दिष्ट असताना ४१८ कोटी ३८ लाख ६१ हजार रुपयांची वसुली झाली आहे.

मुठा विभागांतर्गत सिंचनासाठी ५२ कोटींचे उद्दिष्ट असताना ५२ कोटी ५१ लाख रुपये वसूल करण्यात आले. गेल्या पाच वर्षांतील ही सर्वाधिक वसुली ठरली आहे. बिगरसिंचनासाठी २४४ कोटी ५१ लाख रुपयांची वसुली करण्यात आली असून, त्यात सर्वाधिक वसुली ही पुणे महापालिकेकडून करण्यात आली आहे. बिगरसिंचन विभागात पाणीपट्टी वसुलीत पुणे शाखा अव्वल स्थानी ठरली आहे. पवना उपविभागाचे सिंचनाचे उद्दिष्ट ६५ लाख होते. त्या विभागाकडून सुमारे ९१ कोटींची वसुली करण्यात आली. १३९ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले. गेल्या पाच वर्षांमध्ये ही वसुली सर्वाधिक ठरली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सुद्धा ६५ कोटी रुपयांची पाणीपट्टी भरली आहे.

> पाणी कपातीचा इशारा आणि थकबाकी भरण्यासाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे महापालिकेने २०० कोटींची रक्कम भरली आहे. त्यामुळे खडकवासला प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ४२२ कोटी ४५ लाख रुपयांची वसुली ही सर्वाधिक ठरली आहे.
>
> **- श्वेता कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता, खडकवासला प्रकल्प.**

**पाणीपट्टी (रक्कम कोटींत)**

| वर्ष | सिंचन | बिगरसिंचन | एकूण |
|---|---|---|---|
| ३१ मार्च २०२२ | ३१२.०३ | १५८७८.८२ | १६१९०.८५ |
| ३१ मार्च २०२३ | ३१४.७३ | २२३९३.८२ | २२७०८.५५ |
| ३१ मार्च २०२४ | ३४१.८३ | ३३४६५ | ३३८०६.८३ |
| ३१ मार्च २०२५ | ४०७.०६ | ४१८३८.६१ | ४२२४५.६७ |

# हिंजवडीतील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांचे 650 कोटींचे प्रकल्प

## हिंजवडीतील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे भविष्यात आयटी पार्कमधील कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. आयटी पार्कमध्ये वाहनांची संख्या गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे सध्याचे रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यातच या रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने वाहतूककोंडी ही नित्याचीच बाब आहे. त्यामुळे उड्डाणपुलासह नवीन पर्यायी रस्ते तयार केले जाणार आहेत. हिंजवडीतील लक्ष्मी चौकात सातत्याने वाहतूककोंडीचे होते. ही कोंडी सोडविण्यासाठी या चौकात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल चारपदरी आणि ७२० मीटर लांबीचा असेल. त्यासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.



हिंजवडीतील शिवाजी चौक ते स्मशानभूमी या रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आहे. हा रस्ता सहापदरी केला जाणार आहे. यासाठी २४.७४ कोटी रुपये खर्च येणार आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील टप्पा एकपासून टप्पा तीनला जोडणारा नवीन रस्ता बांधला जाणार आहे. हा रस्ता ५ किलोमीटर लांबीचा असेल आणि त्यासाठी ५८४.१४ कोटी रुपये खर्च येईल. या दोन्ही रस्त्यांच्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहेत. याचबरोबर काही भूसंपादन करावे लागणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग ही जागा संपादित करून 'एमआयडीसी'ला देणार होता. परंतु, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे, असा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधी भूसंपादन करून नंतर ही जागा 'एमआयडीसी'ला हस्तांतरित करण्यात वेळ घालवू नये. थेट 'एमआयडीसी'नेच भूसंपादन करून रस्त्यांचे काम सुरू करावे, असे निर्देशही त्या वेळी देण्यात आले होते. यामुळे या प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी 'एमआयडीसी'कडून प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे.

> हिंजवडी आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांसाठी एमआयडीसीकडून भूसंपादन केले जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव अभियांत्रिकी विभागाने पाठविला होता. तो मुख्यालयाला पाठविण्यात आला असून, तो मंजूर झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार भूसंपादन सुरू होईल.
>
> **- अर्चना पठारे, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी.**

# वाकड- ताथवडे परिसरातील नागरिक धुळीने हैराण

## शनि मंदिर रोड परिसरातील सोसायटीधारकाना सिमेंट मिश्रित धुळ, हवा प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचा रोग व इतर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड-ताथवडे परिसरातील शनि मंदिर रोड परिसरातील सोसायटीधारकाना सिमेंट मिश्रित धुळ, हवा प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचा रोग व इतर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. याबाबत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांना वारंवार कल्पना देऊन ही त्यांनी दुर्लक्ष केले.

वाकड-ताथवडे परिसरातील शनि मंदिर रोड परिसरातील सोसायटीधारकाना सिमेंट मिश्रित धुळ, हवा प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचा रोग व इतर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. याबाबत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांना वारंवार कल्पना देऊन ही त्यांनी दुर्लक्ष केले. आपली लढाई आपणच लढली पाहिजे ही भावना सोसायटीधारकांच्यामध्ये तयार होऊन गेल्या आठवड्यात महापालिका व इतर प्रशासनाला निवेदन देत या त्रासापासून आमची मुक्तता करा अशी विनंती केली होती. परंतु त्यावर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी कोणतीच भूमिका न घेतल्याने अखेर शनिवारी संबंधित सोसायटीधारक रस्त्यावर उतरले.

वाकड-ताथवडे परिसरातील २२ पेक्षा अधिक गृहनिर्माण सोसायट्यांतील रहिवाशांनी शनिवारी मूक मोर्चा काढला. सिमेंट मिक्स धुळ आणि बांधकामाच्या धुळीमुळे वाढलेल्या प्रदूषणाच्या विरोधात आवाज उठवत स्वच्छ व निरोगी पर्यावरणासाठी तोंडावर मुखपट्टी लावून कोहिनूर कोर्टयार्ड सोसायटी ते वाकडकर कॉर्नरपर्यंत हातात विविध मागण्यांचे बॅनर घेत मुकमोर्चा काढला. या मोर्चात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सोसायटीधारकांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, जर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर हे आंदोलन पुढील स्तरावर नेले जाईल.

वाकड-ताथवडे परिसरातील नागरिकांनी या आंदोलनाच्या माध्यमातून स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणासाठी लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. स्वच्छ हवा आपला हक्क आहे आणि तो मिळेपर्यंत आम्ही लढत राहणार असल्याचा निर्धार मूक मोर्चात सहभागी नागरिकांनी व्यक्त केला आहे.



### या मुकमोर्चात मांडलेले मुद्दे

- हवा प्रदूषणाचा वाढता स्तर: सिमेंट मिक्स धूळ आणि रस्त्यावरील अवजड वाहनांमुळे होणारे प्रदूषण यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून श्वसनाचे आजार वाढत आहेत.
- आरोग्यावर गंभीर परिणाम: परिसरातील लहान मुले, वृद्ध आणि गरोदर महिलांमध्ये दम्याचे, ॲलर्जीचे आणि श्वसनासंबंधी आजारांचे प्रमाण वाढत आहे.
- प्रशासनाकडून दुर्लक्ष: पिंपरी-चिंचवड महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.
- नैसर्गिक जीवनमानावर परिणाम: सिमेंटच्या धुळीचा थर रस्त्यांवर, गाड्यांवर आणि घरांवर साचत असून नागरिकांचे जीवनमान ढासळत आहे.

### नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- सिमेंट मिक्स धूळ त्वरित बंद व्हावी.
- वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम आणि उपाययोजना लागू कराव्यात,
- वायू प्रदूषण पातळीची नियमित तपासणी करून अहवाल सार्वजनिक करावा.
- रस्त्यांची नियमित २ वेळा साफसफाई करून धुळीचे प्रमाण कमी करावे.
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर कठोर कारवाई केली जावी.
- रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी टँकरद्वारे, एअरगन द्वारे नियमितपणे पाण्याचा फवारा मारला जावा
- प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून आवश्यक ती आरोग्यसेवा पुरवावी.
- रस्त्यांवरील झाडांची देखभाल आणि पाणी पुरवठा नियमित करावा.

> न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन करत राहणार आहोत. अनेक वर्षांपासून या त्रासाला आम्हाला सामोरे जावे लागत आहे. अनेक लोकप्रतिनिधींना याबाबत कल्पना दिली आहे. मात्र त्यांच्याकडून कोणतीच मदत होत नसल्याने आपली लढाई आपणच लढण्याचा आम्ही निर्धार केला आहे
>
> - अशोक साळुंखे, स्थानिक नागरिक

# सहाय्यक आयुक्ताची बडतर्फी मागे घेत प्रशासनाची शरणागती

## महापालिका प्रशासनाचा अजब कारभार – तीन अपत्य असल्याने केले होते बडतर्फ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागातील दिव्यांग कक्षाचे सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट यांना तीन अपत्य असल्याने महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी त्यांना ७ जानेवारी २०२५ ला महापालिका सेवेतून बडतर्फ केले. त्या विरोधात दांगट यांनी मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला. न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांना पुन्हा सेवेत रूजू करून घेत शरणागती पत्कारण्याची वेळ आली. महापालिका प्रशासनाच्या या अजब कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

सहाय्यक आयुक्त दांगट हे महापालिकेत प्रशासन अधिकारी म्हणून १४ ऑक्टोबर २०१३ ला रूजू झाले. त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ नुसार सेवेत रूजू होताना प्रतिज्ञापत्र सादर केले नाही. त्यांना तीन मुले असल्याची तक्रार महापालिकेस प्राप्त झाली. महापालिकेच्या ३० ऑगस्ट २०२१ च्या चौकशीत ही बाब खरी असल्याचे उघड झाले. त्यांनीही ही बाब कबुल केली. त्यानंतर विभागीय चौकशी करण्यात आली. समितीचा अहवाल १८ जुलै २०२२ ला प्राप्त झाला. त्यात त्यांच्यावरील दोषारोप सिद्ध झाले. दांगट यांनी केलेला खुलासा मान्य करण्यात आला नाही. त्यानंतर अडीच वर्षांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दांगट यांना ७ जानेवारी २०२५ ला सेवेतून बडतर्फ केले.

महापालिकेच्या या कारवाईच्या विरोधात दांगट यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाने २६ फेब्रुवारीच्या सुनावणीत महापालिका आयुक्त यांच्या ७ जानेवारीचा दांगट यांना बडतर्फ करण्याचा आदेश रद्द केला. त्यांना सेवेत पुन्हा घेण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले. तसे, महापालिकेचे वकील ॲड. केदार दिघे यांनी महापालिका आयुक्तांना कळविले. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दांगट यांच्यावरील कारवाई रद्द करीत त्यांना तातडीने दुसऱ्या दिवशी २७ फेब्रुवारीला पुन्हा सेवेत रूजू करून घेण्यात आले. त्यांना ७ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीतील वेतनही देण्यात आले.




### साडेसात लाखांचा दंड

- महापालिकेने केलेली कारवाई न्यायालयाने फेटाळली. त्यामुळे महापालिका प्रशासनावर संबंधित अधिकाऱ्यास पुन्हा कामावर रूजू करून घेण्याची नामुष्की ओढविली. दरम्यान, तीन अपत्य असल्याचे महापालिका प्रशासनापासून लपवून ठेवल्याने न्यायालयाने सहाय्यक आयुक्त दांगट यांना ७ लाख ५० हजार रूपयांचा दंड केला आहे.

> मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट यांच्यावरील कारवाई रद्द करण्यात आली आहे. त्यांना पुन्हा महापालिका सेवेत घेण्यात आले. ते सेवानिवृत्त झाले. त्यांना महापालिका नियमानुसार निवृत्तवेतन तसेच, इतर लाभ दिले जातील.
>
> - विठ्ठल जोशी, उपायुक्त.

# जिवंत सातबारा मोहिमेला उदंड प्रतिसाद

## शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी), नवीन मतदार नाव नोंदणी, रेशनिंग कार्ड वरील नावे कमी करणे व वाढविणे यासाठी ही मोहीम राबवण्यात येत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन महसूल विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय पुणे तसेच तहसील कार्यालय जुन्नर व ग्रामपंचायत राजुरी आणि समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जिवंत सातबारा मोहीम राजुरी (ता. जुन्नर) येथे यशस्वीपणे राबविण्यात आली.

महसूल विभाग 100 दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडील निर्देशानुसार सर्व खातेदारांच्या वारसाच्या नोंद अधिकार अभिलेखामध्ये अद्ययावत करून मयत खातेदारांच्या वारसाच्या नोंदीचे कामकाज पूर्ण करण्याच्या दृष्टीने राजुरी गावांमध्ये ही मोहीम राबवण्यात येत आहे.

त्याचबरोबर शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी), नवीन मतदार नाव नोंदणी, रेशनिंग कार्ड वरील नावे कमी करणे व वाढविणे यासाठी ही मोहीम राबवण्यात येत आहे. जुन्नर तालुक्याचे तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

तहसीलदार सुनील शेळके म्हणाले की, महाराष्ट्र शासन महसूल विभागाच्या वतीने जिवंत सातबारा मोहीम आपल्या राजुरी गावामध्ये राबविण्यात येत आहे त्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी आणि समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांनी परिश्रम घेऊन याबाबतची माहिती वाड्यावस्त्यांवर जाऊन त्याचप्रमाणे प्रत्येक मळ्यामध्ये जाऊन लोकां पर्यंत पोहोचवलेली आहे.

त्याचप्रमाणे इ रेशन कार्ड असेल ईपीक पाहणे असेल यासारखे अभिनव आणि समाजाभिमुख उपक्रम लोक सहकार्याने उत्तम रित्या पार पडलेले आहेत.जिवंत सातबारा उपक्रमासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन गावोगावी हा उपक्रम यशस्वीरित्या राबवण्यात यावा असे आव्हान तहसीलदार शेळके यांनी केले.




### मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट

» ज्या शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या वारसांची माहिती अधिकृत अभिलेखांमध्ये समाविष्ट करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. योग्य प्रक्रियेनुसार वारसांची नोंद सातबारा उताऱ्यावर होत नसल्याने जमिनीच्या खरेदी-विक्री, शेतीसाठी घेतले जाणारे कर्ज, सरकारी अनुदान आणि विविध योजनांचा लाभ मिळवताना वारसांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. शासनाने हा प्रश्न सोडवण्यासाठी 'जिवंत सातबारा' मोहीमेच्या माध्यमातून नोंदणी प्रक्रिया जलद आणि पारदर्शक करण्याचा निर्णय घेतला आहे.

### या शेतकऱ्यांना मिळणार लाभ

» ज्या शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन वारसांपर्यंत अधिकृतपणे पोहोचवायची राहिली आहे, त्यांना या मोहिमेचा फायदा होईल. अधिकृत वारसहक्क नोंदणी झाल्यानंतर जमिनीच्या व्यवहारात कोणत्याही प्रकारचा कायदेशीर वाद उद्भवणार नाही. शेतकऱ्यांचे वारस बँक कर्ज, अनुदान आणि सरकारी योजनांचा लाभ सहज मिळवू शकतील.

### नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

» मृत्यू प्रमाणपत्र (मृत खातेदाराचा अधिकृत दाखला)
» वारस प्रमाणपत्र (स्वतःची घोषणापत्र किंवा सत्यप्रतिज्ञा)
» ग्रामपंचायत किंवा पोलिस पाटील यांचा अधिकृत दाखला
» वारसांची संपूर्ण माहिती (नाव, वय, पत्ता आणि संपर्क क्रमांक)
» रहिवासी पुरावा (तलाठी कार्यालयातील नोंदींचा दाखला)

### नोंदणी प्रक्रिया कशी असेल?

» शेतकऱ्यांच्या वारसांनी संबंधित कागदपत्रांसह तलाठ्याकडे अर्ज करावा.
» तलाठी चौकशी करून आवश्यक माहिती गोळा करतील.
» तयार झालेला चौकशी अहवाल मंडळ अधिकाऱ्यांकडे पाठवला जाईल.
» 'ई-फेरफार प्रणाली'च्या माध्यमातून वारसहक्क नोंदी अधिकृतपणे सातबारा उताऱ्यावर चढवण्यात येतील.

# उरुळी कांचन ते स्वारगेट पीएमपीएमएलबस सुरू

## जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य संतोष कांचन यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील दोन वर्षापूर्वी उरुळी कांचन ते स्वारगेट पर्यंतची पीएमपीएमएलची बससेवा बंद पडली होती. त्यामुळे उरुळी कांचनसह परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना पुण्यात शिक्षणासाठी जाण्यासाठी अडचणींना सामना करावा लागता होता. ही बससेवा पूर्ववत सुरू व्हावी, अशी मागणी विद्यार्थी व प्रवासी संघटनेने केली होती. या मागणीचा जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य संतोष कांचन यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. ही बस सेवा शुक्रवार (दि. 5) पासून नागरिकांच्या सेवेत दाखल झाली आहे.

उरुळी कांचन शहर हे पुण्यापासून अवघ्या 30 किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे येथील कामगार वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने पुण्यात जातात. त्यामुळे नागरिकांनी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडकडे बससेवा सुरू करावी म्हणून मागणी केली होती. त्यानंतर पीएमपीएमएलने नागरिकांच्या सेवेसाठी बससेवा सुरु केली होती; मात्र करोना काळात ही बससेवा बंद करण्यात आली होती. मात्र करोनाचा प्रादुर्भाव संपल्यानंतरही बससेवा सुरु झालीच नाही.

हजारो विद्यार्थ्यांना पुण्यात शिक्षणासाठी जाण्यासाठी अडचणींना सामना करावा लागता होता. ही बससेवा पूर्ववत सुरू व्हावी, अशी मागणी विद्यार्थी व प्रवासी संघटनेने केली होती. या मागणीचा जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य संतोष कांचन यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. ही बस सेवा शुक्रवार (दि. 5) पासून नागरिकांच्या सेवेत दाखल झाली आहे.

संतोष कांचन यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. उरुळी कांचन ते स्वारगेटसह निगडी, वारजे, माळवाडी, भोसरी, हिंजवडी व कात्रज यादरम्यान बस सेवा सुरू करण्यात यावे. असे निवेदन दिले. या निवेदनाची अजित पवार यांनी त्वरित दखल घेतली व पीएमपीएमएलच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ मुंडे यांना बससेवा सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानंतर दीपा मुंडे यांनी उरुळी कांचन ते स्वारगेट पर्यंतच्या बससेवेला हिरवा कंदील दाखविला आहे.



### बससेवा सुरु करावी यासाठी निवेदन

» उरुळी कांचन व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, कामगार व नोकरदार वर्गाला पुण्याला कामाला थेट बस नव्हती. त्यामुळे त्यांना हडपसर येथे उतरून दुसरी बस पकडावी लागत होती. त्यामुळे प्रवास्यांना त्रास सहन करावा लागत होता. ही गैरसोय लक्षात घेता उरुळी कांचन प्रवासी संघाचे अध्यक्ष प्रकाश जगताप यांनी जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व यशवंत कारखान्याचे संचालक संतोष कांचन यांच्याकडे स्वारगेट (सारसबाग) ते उरुळी कांचन पर्यंत बससेवा सुरु करावी. यासाठी निवेदन दिले होते.